ISBN978-93-84021-40-5

SHRI DADASAHEB GAWAI CHARITABLE TRUST, AMRAVATI'S

## DR. BABASAHEB AMBEDKAR MAHAVIDYALAYA, AMRAVATI
## TAKSHASHILA MAHAVIDYALAYA, AMRAVATI &
## RAMKRUSHNA MAHAVIDYALAYA, DARAPUR

JOINTLY ORGANISED

TWO DAY INTERNATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE


ON

# THE METAMORPHOSIS OF WOMEN THROUGH EDUCATION

(Challenges Opportunities and Achievements)

8 & 9 January 2016

CELEBRATING



WOMENHOOD

# PROCEEDING

330

# - अनुक्रमणिका -


| अ.क्र. | नांव | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रा. कु. अंजली घर्डे | भारताच्या विकासात स्त्रियांचे योगदान | १ |
| २. | प्रा. अनिल भिमराव भगत | स्त्रीवादी साहित्याच्या अपेक्षित दिशा | ३ |
| ३. | प्रा. डॉ. भूमिका गो. वानखडे, | विजय तेंडुलकरांच्या नाटकातील स्त्री व्यक्तिरेखा | ५ |
| ४. | डॉ. माधुरी भटकर | स्त्रियांच्या मनस्थितीचे विरेचन [illegible]धी नाट्य आणि खेळ | ७ |
| ५. | डॉ. डि. एम. मोहोड | स्त्री नेतृत्व आणि राजकारण | ८ |
| ६. | डॉ. सुनिता एस. वाळापुरे | राज्यघटनेतील अधिकार आणि महिला सक्षमीकरण | १० |
| ७. | डॉ. अलका गायकवाड | स्त्रियांचे आत्मभान जागे करणारी स्त्रीवादी कविता | १२ |
| ८. | डॉ. वर्षा एन. चिखले | संत कवयित्रींचा स्त्रीमुक्तीचा विचार | १५ |
| ९. | डॉ. सुनंदा गडकर | ग्रामगीतेतील स्त्री दर्शन | १८ |
| १०. | प्रा.सुविनी ह.गणवीर | भारतातील आदिवासींची सद्यस्थिती आणि आदिवासी स्त्रीयांच्या समस्या | २० |
| ११. | प्रा. कविता कोत्तावार | हिंदू स्त्री विषयक कायदे व वास्तविकता | २३ |
| १२. | डॉ. सुलभा खर्चे | आई रिटायर होतेय या नाटकातील स्त्रीदर्शन | २५ |
| १३. | प्रा.कु.लीना शरदराव गावंडे | विषेशता : नामविश्लेषणात्मक दृष्टिकोनातून | २८ |
| १४. | कु. मेघा ज्ञा. तेलखडे | उच्चशिक्षण आणि स्त्रीची सक्षमता | ३० |
| १५. | प्रा. मंदाकिनी मेश्राम | डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकथा, कादंबरीतील स्त्रीविश्व आणि वास्तव | ३२ |
| १६. | प्रा. कु. मंगला मा. कनाटे | आदिवासी परीक्षेत्रातील स्त्रिया आणि शाश्वत विकासाचा प्रश्न | ३३ |
| १७. | प्रा.सुनिता मनवर | नेतृत्व व प्रशासनामध्ये भारतीय महिला | ३५ |
| १८. | डॉ. निशा शेंडे | महाराष्ट्रातील वैचारिक साहित्यातुन व्यक्त झालेले स्त्रीजीवन | ३७ |
| १९. | प्रा. पी. एल. अंबोरे | भारतीय स्त्री आणि मानवाधिकार | ३९ |
| २०. | प्रा. कु. निना सा. चवरे | भारतीय स्त्रीयांचे संविधानीक व कायदेशीर अधिकार | ४१ |
| २१. | प्रा.वैशाली तुकाराम लोणे | विषमता : मनोविश्लेषणात्मक दृष्टीकोन | ४४ |
| २२. | प्रा. जी. एच. पांडे | बौध्द धम्म आणि स्त्रियांचा सामाजिक न्याय | ४७ |
| २३. | प्रा.संगीता मंगेश खडसे | महिला सबलीकरण | ४८ |
| २४. | प्रा. मंदा माणिकराव नांदुरकर | आदिवासी स्त्री जागृतीचा लढा | ४९ |
| २५. | प्रा. कु. शामली जा. दिघडे | स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरण | ५२ |
| २६. | डॉ. आशा म. धारस्कर | स्त्री, शिक्षण व मानवाधिकार | ५४ |
| २७. | प्रा. कु. लाजवंती आर. टेंभुर्णे | भारतातील स्त्रि उद्योजकापुढिल समस्या व संधी | ५७ |
| २८. | डॉ. अण्णा वैद्य | आंबेडकरी मराठी कविततेतील स्त्री दर्शन | ६० |





Scanned by TapScanner

| अ.क्र. | नांव | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| २९. | डॉ. आंबटकर वृषाली ओंकार | आदिवासी स्त्री व शाश्वत विकास | ६२ |
| ३०. | डॉ. पंकज वानखेडे | ज्ञानतपस्विनी : दुर्गा भागवत | ६४ |
| ३१. | प्रा. डॉ. पूनम अभ्यंकर | स्त्री जीवनातील स्थित्यंतरे - थेरीगाथा ते आंबेडकरी स्वकथन एक अभ्यास | ६६ |
| ३२. | प्रा. राजेश मेश्राम | स्त्री शिक्षण विषयक विचार कार्यांचे ऐतिहासीक अध्ययन | ६९ |
| ३३. | प्रा.डॉ. माधुरी म. पाटील | 'राजा शहाजी' या ऐतिहासिक कादंबरीतील स्त्री जाणीव | ७१ |
| ३४. | प्रा.देवलाल एस. आठवले | नेतृत्व प्रशासन व स्त्रिया विशेष संदर्भ : इंदिरा गांधी | ७२ |
| ३५. | डॉ.गिरीश खारकर | समाजातील सर्व स्तरावर होत असलेले स्त्रियांचे मानसिक व शारीरिक शोषण | ७४ |
| ३६. | कु.वैशाली रत्नाकर कराळे | साहित्यातील स्त्री | ७५ |
| ३७. | प्रा. सारिका एन. दांडगे (कोंदडे) | स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य | ७७ |
| ३८. | डॉ. मोना चिमोटे | निवडक कवयित्री : निवडक कविता | ७८ |
| ३९. | प्रा. भगवान पांडुरंग फाळके | तीन हिंदी चित्रपट : लिंगभाव परिप्रेक्ष्यातून | ८३ |
| ४०. | प्रा. अर्चना अ. पडगिलवार | महिला विकासात मिडियाची भूमिका | ८७ |
| ४१. | कु. भाग्यश्री वसंतराव रवाळे/ कु.दिपीकी विनोदराव भुसारी | वाढत्या उद्योग प्रेरणेचा स्त्रीचा नवा अवतार | ९० |
| ४२. | प्रा. सौ. अनिता एन.सोनुले | महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे स्वावलंबन | ९१ |
| ४३. | प्रा. रजनी भिमराव गेडाम | पाली साहित्यातील थेरी गाथेतील स्त्री प्रतिमा | ९३ |
| ४४. | डॉ. जयमाला एल. रामटेके | शिक्षण आणि महिला सक्षमीकरण | ९७ |
| ४५. | डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे | विभावरी शिरूरकरांच्या साहित्यातील स्त्री मुक्तीच्या पाऊलखुणा | ९९ |
| ४६. | प्रा. वसंत राठोड | भारतीय राज्यघटनेतील स्त्रियांसाठी असलेल्या महत्वाच्या तरतुदी | १०१ |
| ४७. | डॉ. सुशिला धाबे | रा. संताच्या दृष्टीतील स्त्रि म्हणजे राष्ट्रशक्ती व स्वतंत्र महिला | १०३ |


330

 ISBN 978-93-84021-40-5

Scanned by TapScanner

पालन करुन अर्हतपदाला पोहोचल्या आणि दुःख मानसिक गुलामगिरीतून मुक्त झाल्या. त्या केवळ प्रबळ इच्छाशक्तीमुळे आणि पर्यायाने स्त्रि (खिला) भौतिक आणि मानसिक व्यक्तिमत्त्वाचा विकास करुन घेण्यासाठी पुरुषाप्रमाणेच विकासाची संधी मिळाली.


**संदर्भ सूची :**

१) भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म / अनुवाद- तळवटकर, चिटनीस रेगे.

२) थेरीगाथा.

३) बौध्द धम्मातील स्त्री विचार, लेखीका - छत्रे, प्रकाशन-सुगावा प्रकाशन, पुणे.


*************

# महिला सबलीकरण


प्रा.संगीता मंगेश खडसे

शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख

कला आणि विज्ञान महाविद्यालय, मेहकर, जिल्हा-बुलढाणा


**प्रस्तावना -**

स्त्रियांबाबतचा पारंपारिक दृष्टिकोन हा 'स्त्रि ही ' 'चुल व मूल' या पलीकेडे काही करू शकत नाही, तिचे क्षेत्र हे कुटुंबापुरतेच मर्यादित आहे. असा होता. अलीकडे तो दृष्टिकोन बदलला आहे. अर्थात, अनेक समाजसुधारकांनी आणि स्त्री संघटनानी जगभर जे कार्य केले त्याचे फलित म्हणजे आज समाजाचा स्त्रियाबाबत बदललेला दृष्टिकोन हे म्हणता येईल.स्त्री-पुरूष समानता या एकाच मुद्दयावर स्त्रियांच्या उध्दाराचे आणि विकासाचे अनेक प्रयत्न झाले. जगभर स्त्रीजागृती करण्याचे प्रयत्न झाले व त्यांतूनच स्त्रियांना केवळ समान दर्जा दिला म्हणे सर्व काही झाले, असे नव्हे तर सर्वच ठिकाणी स्त्रियांचा अग्रक्रमाने विचार झाला पाहिजे, विशेषतः निर्णयप्रक्रियेत आणि विकासप्रक्रियेत व प्रशासनात स्त्रियांना सामावून घेऊन त्याचप्रमाणे निर्णप्रक्रिया राबविली पाहिजे व विकासप्रक्रियेस गती दिली पाहिजे, हा विचार पुढे आला. स्त्रियांचा उध्दार करण्यापेक्षा स्त्रियांचे सबलीकरण करणे महत्वाचे आहे. हा मुद्दा जागतिक महिला परिषदेने अधोरेखित केला. त्या अनुषंगाने '२००१' हे वर्ष महिला सबलीकरणाचे वर्ष म्हणून पाळले गेले.

जवळजवळ सर्वच देशांत स्त्री-सबलीकरणाचे कार्य नागरी संघटनांच्या कार्याचा एक भाग बनले आहे. परंतु भारताच्या संदर्भात ते विकास तत्वज्ञानाचाच एक भाग मानने अगत्याचे आहे. लिंगभेदविरहित समानता हे तंत्रज्ञानाने मिळण्याचे ध्येय नसून ती एक राजकीय प्रक्रिया आहे. त्यामध्ये विचारशक्ती जागृत करून स्त्री-पुरूष दोघांनी मिळून एक तत्वज्ञान विकसित करावसयाचे आहे. त्यामुळेच समाजात व देशातही हवे असलेले बदल घडून येतील. . या संदर्भात मेरी वोल्सातोनो क्रॅफ्ट यांनी 'ए व्हींडीकेशन ऑफ द राईट वुमन' या ग्रंथात असे म्हटले आहे की, स्त्रियांना दान नाको आहे, त्याना न्याय हवा आहे. हे वाक्य खूप सूचक व सर्व परिस्थितीवर प्रकाशझोत टाकणारे आहे. श्रीमती क्लिंटन यांनी राजीव गांधी फाऊडशेनमध्ये दिलेल्या भाषणात असे उद्गार काढले की, 'र्खों ळी रिींळलीश्ररीश्रू ळ्ोीरिर्पी ीहशीीाप पळपव ीहशाळीुप ीळलश रपव लशलेश रिींळलळ्रिर्पी रपव वशलळीळेप ाळ्रशी ळप ीहश होश ीहशुीिुप्रश्रलश, रपव लशलोशी रिींळलळ्रिर्पी रपव वशलळीळेप ाळ्रशी ळप ीहश होश ीहशुीि ध्रिलश, लेीपर्ळीू रपव पर्ीळेप. 'अलीकडेच्या इतिहासाने आपल्याला असे शिकविले आहे की, जेथे स्त्रीया समृध्द आहेत ते देशदेखील समृध्द होतात, असेही श्रीमती क्लिंटन प्रतिपादन करतात.

स्त्री सबलीकरणामध्ये खालील तीन तत्वांना महत्व देण्यात आले आहे-

१) स्त्री-पुरूष यांना समान अधिकार आहेत. हे तत्व मुलभूत तत्व म्हणून मान्य करणे आणि त्यामध्ये कायदेशिर ,आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक अडचणी ओळखून धोरणात्मक सुधारणा व कडक सकारात्मक कारवाई करून उपाययोजना करणे.

२) या सुधारणांचा फायदा मिळण्यासाठी स्त्री लाभार्थी आहे व त्या सुधारणा घडवून आणण्यात तिचा हातभार आहे हे समजून कार्य करणे,स्त्रियांच्सया क्षमतेमध्ये गुंतवणूक करून त्यांना त्यांच्या मताप्रमाणे कार्य करू देणे. ज्यामुळे त्यांचा सर्वतोपरी फायदा होईल आणि त्यांची प्रगती होऊन अधिक सबल बनतील.

३) लिंगभेद नाहीसा करण्यासाठी योजेलेल्या या विकासप्रक्रियेत स्त्री किंवा पुरूष दोघांच्या बाबतीत विचार करतांना दोघांना एक सारखी संधी दिली जावी.

स्त्री सबलीकरणाच्या संदर्भात एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, मनुष्याचा विकास फक्त मिळकत वाढविल्याने, शिक्षणाने चांगल्या आरोग्याने ,शुध्द वातावरणानेच होतो असे नाही. तर त्यासाठी कळकळ असणे, दुसऱ्याबद्दल काळजी वाटणे अधिक महत्वाच असते. ही क्रिया माणसा माणसांतील बंधनातून येते. दुसऱ्याबद्दलच्या आस्थेला 'सामाजिक पुनरूत्पादनाची क्रिया' असेही म्हटले जाते. जागतिकीकणाने आस्थेवाईक कामगरांवर व काळजीने काम करणाऱ्यांवर गदा येण्याचा संभव असतो. स्त्री -पुरूष ज्या तऱ्हेने काम करतात,




Scanned by TapScanner

त्यामध्ये आजकाल होणाऱ्या बदलाने काळजी घेण्यासाठी असलेला वेळ कमी होतो आहे. त्या दृष्टिने स्त्री - सबलीकरणाकडे लक्ष दिले पाहिजे. कारण जगभर संगोपन व काळजी घेण्याचे कार्य स्त्रिया करीत असतात.

भारतामध्ये स्त्री-पुरूषांना कायद्याने समान अधिकार दिले आहेत. सामाजिक क्षेत्राच्या विकाससंदर्भात स्त्रियांमध्ये आर्थिक, सामाजिक बदल घडवून आणण्याच्या कामात स्त्रियांचे सबलीकरण करून त्यांना सक्षम बनविण्याचे प्रयत्न सरकारी पातळीवर सुरू आहेत. स्त्रियांच्या आर्थिक सबलीकरणासाठी पंचवार्षिक योजनांमधून निधीची तरतूद करण्यात येत आहे. वुमन्स कॉम्पोनंट प्लॅन नावाची योजना सुरू करण्यात आली आहे. अनौपचारिक क्षेत्रातील गरीब कुटुंबातही मालमत्ता नसलेल्या स्त्रियांना खालच्या पातळीवर कर्ज मिळावे म्हणून राष्ट्रीय महिला कोष स्थापन करण्यात आला आहे.

स्त्रियांच्या सबलीकरणाच्या योजने अंतर्गत विविध धोरणे आखून लिंगभेद नष्ट करण्याचे प्रयत्न केले जातील, त्यामुळे समाजाचा दृष्टिकोन बदलला जाईल अशी आशा आहे. सामान्यता सर्वच स्तरांवर स्त्रियांचा सहभाग पुरूषांबरोबर राहणे आवश्यक आहे.

सन २००१ मध्ये महिला सबलीकरणाचे [illegible] जाहीर झाले. त्यामध्ये असे स्पष्ट नमूद केले आहे की, स्त्रियांचे सबलीकरण, विकास व प्रगती घडवून आणणे हे यास धोरणाचे लक्ष आहे व ते साध्य करण्यासाठी या धोरणात सर्व संबंधीतांनी मनापासून सहभागी व्हावे त्यामुळे धोरणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला जाईल. या धोरणासाठी ठरविलेल्या लक्ष्यामध्ये प्रामुख्याने स्त्रियांकडे कळकळीने पाहणारी न्यायिक व कायदा पध्दती तयार करणे, स्त्रियांच्या निर्णयक्षमतेचा विकास घडवून आणणे, स्त्री-पुरूष समानता प्रत्यक्षात आणणे महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे,महिलांचे सामाजिक सक्षमीकरण घडवून आणने, स्त्रियांवर होणारे अत्याचार रोखणे, विविध प्रकारच्या सक्षमीकरण घडवून आणने, स्त्रियावर होणार अत्याचार रोखणे,विविध प्रकारच्या कर्ज योजना स्त्रियांसाठी उपलब्ध करून देणे, स्त्रियांवरील अन्यायांबाबत समाजात जागृती घडवून आणणे, स्त्रियांना पंचायतराज संस्थेत अधिकाधिक सहभाग देणे इत्यादी अनेक बाबींचा अंत करण्यात आलेला आहे.

महिला व बालविकास विभागाच्या भूतपूर्व राज्यमंत्री , सुमित्रा महाजन यांनी महिला सबलीकरणासंदर्भात असे म्हटले आहे की, 'मला नेहमी असे वाटते की, स्त्रियांकडे केवळ संख्यसा म्हणून पाहिले जाऊ नये. राष्ट्रीय स्तरावर स्त्रियांचे योगदान किती आहे. या संदर्भात आकडेवारीवरून मूल्यमापन करणे चुकीचे ठरेल, कारण स्त्रियांचे योगदान यसा आकडेवारीपलीकडे खूप मोठे आहे. आणि समाज घडविणारी जन्मदात्री म्हणून स्त्रीचे जे कार्य आह त्याची मोजणी करता येत नाही. तिच्या या योगदानाची अचूक आकडेवारी देता येणार नाही. पाण राष्ट्र-उभारणीच्या कामात तिचा सहभाग असतो. या गोष्टीची चांगली' जाणीव जरी या महिला-सबलीकरण वर्षात झाली तरी त्यामुळे खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची मुहूर्तमेढ रोवली, असे म्हणता येईल.

************

# आदिवासी स्त्री जागृतीचा लढा

मंदा माणिकराव नांदुरकर
मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती

आदिवासी समाज हा नागर समाजापासून दूर दुर्गम भागात वास्तव्य करुन राहत असल्याने आधुनिक विकासापासून आढळतो. आदिवासी स्त्रियांचा संघर्ष त्यांच्यावर होणारा अन्या, त्यांच्या भावना कवितेतून प्रकट होतांना दिसून येतात् प्रस्तुत शोधनिबंधामध्ये उषाकि आत्राम यांचा म्होरकी काव्यसंग्रह तर कुसूम आलाम यांचा रानअसासवांचे तळे तसेच रानपाखरांनी मागा [illegible] प्रामुख्याने विचार केला आहह स्त्रियाच्या व्यथा, वेदना, कवितेतून प्रकट होतात. त्याचप्रमाणे सर्व स्त्रियांना एकत्रित करुन संघटन कौशल्य व स्त्री जागृती [illegible]रता पेटून उठणारी आदिवासी स्त्री दृष्टीस पडते् नेतृत्व, जिदद चिकाटी, निर्भडता व हुशारी इत्यादी गुण अंगी असणारी आदिवासी स्त्री संघर्ष करुन न्याय मागतांना दिसून येते. वाईट कृत्यांचा निषेध करतांना ती दिसून येते. तर स्वकष्टत्वाचा ठामपणा तिच्या नजरेतून जाणवतो व ती एलगार पुकारते.

आम्ही आमचे जग निर्माण केले आहे आम्ही आमचे जगणे मरणे ठरवले आहह आता कोणीही आम्हास थांबवू शकणार नाहह आदिवासींचा इतिहास स्फुर्तिदायी आहह राणी दुर्गावती राणी हिराई, झालकारी बाई यांसारख्या शूर विरांगण होऊन गेल्या आहेत् अन्याय अत्याचारनिमुटपणे सहन करण्यापेक्षा आवाज उठवायला हवा असे कवयित्री धारदार शब्दातून व्यक्त होतांना दिसून येते.

रानकेवडयांनो आता तरी शहाणे व्हा
रानात फुलू नका,
नागाच्या विळख्यात जखडू नका .....।
या इथे असे या
महाकाय नगरातल्या कबुलमोगऱ्या जवळ या